# २२.
# जिल्हा परिषद
# सेस निधीतून राबविण्यात
# येणाऱ्या योजना

प्रशासकीय माहिती पुस्तिका

## २२. जिल्हा परिषद सेस निधी मधून राबविणेत येणाऱ्या इतर योजना

**पिसाळलेले कुत्रे /विषारी साप चावल्यानंतर द्यावयाची लस योजना :-**

ज्या शेतकऱ्याच्या जनावरास पिसाळलेले कुत्रे किंवा विषारी साप चावलेला आहे अशा लाभधारकाकडून प्रत्येक मोठ्या जनावरास रुपये १०/-, इतर सर्व जनावरांना रुपये ५/- प्रमाणे नाममात्र फी घेउन शासन निर्णयानुसार आवश्यक ते सेवाशुल्क आकारुन १०० टक्के अनुदानावर लस उपलब्ध करून दिली जाते.

**जंत निर्मूलन योजना :-**

निरनिराळ्या जंताचे प्रादुर्भावामुळे जनावरांचे होणारे नुकसान टाळणेसाठी ही योजना उपयुक्त आहे.

**जनावरांना क्षार मिश्रणे व जीवनसत्वे पुरवठा करणे :-**

सदर योजनेतून पशुवैद्यकीय दवाखान्यांमार्फत जनावरांना क्षार मिश्रणे व जीवनसत्वे पुरवठा करणेत येतात.

**जनावरांना खोडे पुरविणे :-**

सदर योजनेतून पशुवैद्यकीय दवाखान्यांना तसेच ग्रामपंचायतींना खोडे पुरवठा करणेत येतात.

**आदर्श गोपालक पुरस्कार योजना :-**

पशुपालकांमध्ये उत्तम जातीची जनावरे व जादा दुग्धोत्पादन करणा-या गाई /म्हशीचे संगोपन करण्याची आवड निर्माण व्हावी तसेच जनावरांची शास्त्रोक्त पद्धतीने निगा राखण्याची आवड निर्माण व्हावी, पर्यायाने पशुपालकांची आर्थिक उन्नती होऊन पशुपालकांचे राहणीमान उंचावणेस मदत होईल या उद्देशाने सदरची योजना राबविणेचे आहे.

सदरची योजना राबविणेसाठी (१) पशुपालकाकडे असणारी उत्तम प्रतीची जनावरे, (२) शास्त्रोक्त पध्दतीने केलेल्या गोठ्याची व्यवस्था, (३) पशुपालकांचा दुग्धस्पर्धेतील सहभाग, (४) मागील तीन वर्षातील पशुपालनापासून व दुग्ध उत्पादनातून साधलेली प्रगती, (५) सुधारित चाऱ्याचे उत्पादन आणि वैरण कुटीसाठीची सोय, (६) जनावरांच्या गोठ्यातील अत्त्याधुनिक यंत्रसामुग्री, जनावरांना विम्याचे संरक्षण, (८) दुग्ध उत्पादनाच्या अद्यावत नोंदवह्या, (९) लाभार्थी कुटुंबांकडे स्वतःचे शौचालय असावे, १०) लाभार्थीस १-५-२००१ नंतर २ पेक्षा जास्त हयात अपत्ये नसावीत.

| अ. क्र. | जिल्हा परिषद सेस निधी | | | |
|---|---|---|---|---|
| १. | पशुपालकाना उपयुक्त साहित्य पुरवठा. | अन ब्रेकेबल प्लास्टिकचे १ घमेले, १ बादली व १ किटली वाटप. | सर्वसाधारण पशुपालक, अल्पभूधारक असावा, स्वतःची किमान ३ दुभती जनावरे असावीत. लाभार्थीमध्ये ३३ टक्के महिला असाव्यात. लाभार्थीस १.५.२००१ नंतर २ पेक्षा जास्त हयात अपत्ये नसावीत. | ५० टक्के अनुदान, ५० टक्के लाभधारक हिस्सा. |
| २. | मैत्रीण योजना. | मुलीला जन्म दिलेल्या कुटुंबास ९० टक्के अनुदानावर एक शेळी वाटप योजना. | कुटुंबाने आदल्या वर्षी मुलीला जन्म दिलेला असावा. लाभार्थी कुटुंबास दोन पेक्षा जास्त हयात अपत्ये नसावीत. दोन्ही अपत्ये मुली असलेल्या कुटुंबास प्राधान्य देणेत यावे. लाभार्थी कुटुंबाने दुसऱ्या कोणत्याही शेळी पालन योजनेचा लाभ घेतलेला नसावा. लाभार्थी कुटुंबाने १० टक्के स्वहिस्सा भरावा. लाभार्थी कुटुंबांकडे स्वतःचे शौचालय असावे. | ९० टक्के अनुदान |

**जनावरांचे प्रदर्शन (खिल्लारी बैलांचे प्रदर्शन) :-**

सांगली जिल्ह्यामध्ये बऱ्याच तालुक्यामध्ये खिल्लार जनावराच्या यात्रा भरविल्या जातात. सदर यात्रामध्ये जातिवंत खिल्लार जनावरांना बक्षिस दिले जाते. सदर कार्यक्रमास प्रोत्साहन देणेसाठी तसेच खिल्लार जनावरांची पैदास वाढविणे व जातिवंत जनावरांची जपणूक करणेसाठी सदर जातिवंत जनावरांना रोख स्वरूपात बक्षिस देणेसाठी जिल्हा परिषद सेस निधीतून सन २०११-१२ मध्ये रुपये १ लक्ष आर्थिक तरतूद केली आहे.

**वंध्यत्व निवारण शिबीरे औषध पुरवठा :-**

खात्याच्या मार्गदर्शक सुचनेनुसार पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रामध्ये असलेल्या वांझ जनावरांना योग्य उपचार मिळणेसाठी वंध्यत्व निवारण शिबीरे आयोजित केली जातात. प्रत्येक शिबीरासाठी रुपये ४०००/- ची औषधे व रुपये १०००/- प्रसिध्दी प्रचारासाठी खर्च करणेत येतो. सदर शिबीरांसाठी लागणारी औषधे खात्याच्या दरकरारानुसार खरेदी केली जातात. सदर योजनेसाठी सन २०११-१२ मध्ये रुपये ३ लक्ष आर्थिक तरतूद केली आहे.

**औषधे :-**

पशुसंवर्धन खात्याकडून दवाखान्याना ठरवून दिलेल्या प्रमानानुसार औषध खरेदीसाठी निधी उपलब्ध होत नसलेने जनावरांच्या दवाखान्यामध्ये उपचार मिळणेस अडचणी येवू नये म्हणून जिल्हा परिषदेने जिल्हा परिषद सेसमधून ही योजना सुरू केली आहे. पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी आवश्यक असणारी औषधे खात्याच्या दर करारानुसार खरेदी करून पशुवैद्यकीय दवाखान्याना पुरविली जातात. सदर योजनेसाठी सन २०११-१२ मध्ये रुपये ३.०० लक्ष आर्थिक तरतूद केली आहे.

**दुधाळ जनावरांचे गट वाटप (दोन गाई /दोन म्हशी) :-**

जिल्ह्यातील सर्वसाधारण वर्गामधील शेतकरी पशुपालकाना लाभ देणेच्या उद्देशाने जिल्हा परिषद सेस निधीतून २५ टक्के अनुदानावर दुधाळ जनावरांचे (२ गाय / २ म्हैस) गट वाटप योजना सुरू केली आहे. सदर योजनेतून अत्यल्प/अल्पभूधारक / भूमिहीन शेतमजूर यांना लाभ देणेत येतो. सदर योजनेसाठी सन २०११-१२ मध्ये रुपये ५.०० लक्ष आर्थिक तरतूद केली आहे.

**गोचीड निर्मूलन कार्यक्रम :-**

जनावरांचे आरोग्य निरोगी व उत्पादन क्षमता चांगली राहणेसाठी जनावरांचे शरीर व जनावरांचा गोठा स्वच्छ असणे आवश्यक आहे. पशुपालकाना गोचीडनाशक औषध वापरणेस प्रोत्साहन मिळावे यासाठी जिल्हा परिषद सेस निधीमधून ही योजना राबविणेत येत आहे. सदर योजनेसाठी सन २०११-१२ मध्ये रुपये २.५० लक्ष आर्थिक तरतूद केली आहे.

**सधन पशुविकास (पशुपालक उद्योजकता कार्यशाळा आयोजित करणे) :-**

पशुपालकाना सुधारित अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मिळावी व त्याव्दारे जनावरांचे उत्पादन क्षमतेत वाढ व्हावी यासाठी पशुपालकाची तालुकास्तरावर कार्यशाळा आयोजित करून पशुपालनाविषयी अद्यावत माहिती देणे व त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देणे यासाठी जिल्हा परिषद सेस निधीमधून ही योजना राबविणेत येत आहे. प्रत्येक कार्यशाळेसाठी १० हजार खर्च अपेक्षित आहे. सदर योजनेसाठी सन २०११-१२ मध्ये रुपये १.०० लक्ष आर्थिक तरतूद केली आहे.

**आकस्मित घटना अर्थसहाय्य (वार्षिक मर्यादा रुपये १ लक्ष) :-**

जिल्ह्यामध्ये आकस्मित घटनेमुळे उदा. गोठा जळीतमुळे होणा-या पशुधनाच्या नुकसानीमध्ये मदत करणेच्या उद्देशाने जिल्हा परिषद सेस निधी मधून ही योजना राबविणेत येत आहे. सदर योजनेतून दोन जनावरांच्या मर्यादेत एका मोठ्या जनावरांसाठी रुपये १००००/- व लहान जनावरांसाठी रुपये ३०००/- आर्थिक मदत देणेत येते. सदर मदतीतून लाभार्थीने जवळच्या बाजारातून जनावर खरेदी करणे अपेक्षित आहे. सदर योजनेसाठी सन २०११-१२ मध्ये रुपये १.०० लक्ष आर्थिक तरतूद केली आहे.

♦♦♦